# भेंडी वरील प्रमुख रोग

मोनिका बर्गे
आचार्य पदवी विद्यार्थिनी

डॉ. प्रतापसिंह चव्हाण
आचार्य पदवी विद्यार्थी

भेंडी हे पीक तिन्ही हंगामात घेतले जाते. त्यामुळे या पिकावर किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येतो. यामुळे त्याचे उत्पादन घट होण्यास कारणीभूत ठरते. शेतकरी भेंडी पिकासाठी वेगवेगळ्या वाणाची निवड करतात. काही वाण किडी व रोगांना कमी प्रतिकारक असल्याने अशा वाणांमुळे या पिकावर किडी व रोगांचा संसर्ग मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. किडी व रोगांचे योग्य व्यवस्थापन केल्यास चांगले उत्पादन मिळू शकते.

### भुरी रोग (पावडरी मिलड्यू):

- हा बुरशी जन्य रोग असून याचा प्रसार हवे मार्फत होतो.
- साधारण डिसेंबर ते फेब्रुवरी या थंडीच्या काळात या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून येतो.

#### लक्षणे:

पाने, शेंडे, फांद्या, फुले आणि फळे यावर वरच्या आणि खालच्या बाजूला पांढऱ्या पावडरच्या स्वरूपातील बुरशीची वाढ झालेली दिसून येते.

#### परिणाम:

- भुरी झालेल्या झाडांची वाढ खुंटते.
- फळांचा आकार वाढलेला दिसून येतो.

#### नियंत्रण:

- भेंडी लागवडीच्या वेळी प्रत्येक १० ओळीनंतर एक ओळ पिवळ्या रंगाच्या झेंडू फुलांची लावावी.
- पाण्यामध्ये गंधक भुकटी (८०%) ३० ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा बुरशीनाशक ५ मिलि किंवा डायनोकॅप (कॅराथेन) १० मिलि यापैकी कोणतेही एका बुरशीनाशकाची ९० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा ३०० मेश गंधकाची दहा किलो प्रती हेक्टरी या प्रमाणात वारा शांत असताना धुरळणी करावी.
- हा रोग कोरड्या हवामानात पिकाच्या वाढीच्या कुठल्याही अवस्थेत येऊ शकतो.

### केवडा (यलो व्हेन मोझॅक):

- हा विषाणू जन्य रोग असून याचा प्रसार पांढऱ्या माशी द्वारे होतो.

#### लक्षणे:

- कोवळ्या पानांच्या शिरा पिवळ्या पडतात.
- पानांचा भाग पिवळसर हिरवट दिसतो.
- पानांच्या शिरा पिवळ्या पडून कालांतराने पाने गळून पडतात.

#### नियंत्रण:

- प्रादुर्भाव झालेली झाडे ताबडतोब उपटून नष्ट करावीत.
- पिकाखालील जमीन तणविरहीत ठेवावी.
- पिकाच्या सुरवातीलाच फोरेट या किटकनाशकाचा प्रती हेक्टरी दहा किलो या प्रमाणात जमिनीत वापरावे.
- प्रतिकारक्षम जातीची लागवडीसाठी निवड करावी.
- अर्क अभय, परभणी क्रांती या जाती यलो व्हेन मोझॅक प्रतिकारक्षम असून उत्पादन खूप देतात.

### मर रोग:

- हा रोग बुरशीमुळे होतो, जो जमिनीत बराच काळ टिकून राहतो.
- बुरशी मुळावर आक्रमण करते. वहन करणाऱ्या भागांवर वाढते, ज्यामुळे पानी व पोषण पुरवठा होत नाही.
- रोपांना रोग थेट मुळातून किंवा मुळांवर झालेल्या जखमांमुळे देखील होऊ शकतो.

#### लक्षणे:

- झाडांची पाने पिवळी पडतात.
- फांदीच्या आतील भाग तपकिरी /लाल रंगाचा असतो.
- झाडांच्या फांद्या झुकल्या सारख्या दिसतात व कालावधीने झाडे मरते.

#### नियंत्रण:

- एकाच जमिनीवर भेंडीची सतत लागवड करणे टाळावे.
- ६ ग्रॅम कराथेन १० लिटर पाण्यात किंवा १ ग्रॅम बाविस्टीन १ लिटर पाण्यात मिसळून फवारावे
- सुरवातीला लक्षणे दिसताच ५-६ दिवसांच्या अंतराने रोगाचा प्रसार तपासून घ्यावा.
- ट्रायकोडर्मा व्हिरिडेचा वापर (१० ग्रॅम) प्रती किलो साठी वापरावे.
- जमिनीतील सामू ६.५ ते ७ राखावा.
- रोगाच्या लक्षणासाठी शेताचे नियमितपणे निरीक्षण करून संक्रमित झाडे काढून टाका.

### चुरडा मुरडा:

- हा एक विषाणूजन्य रोग आहे. हा रोग शेतात येऊ न देणे हा एकच पर्याय आज शेतकरी बंधु समोर आहे ५० टक्के रस शोषक किडी या नर्सरी अवस्थेत पिकाला लागतात व त्या काळात हा विषाणू पसरतो.
- या रोगाचा प्रसार फुलकिडे, पांढरी माशी, कोळी या रस शोषणाऱ्या किडी मार्फत होतो.

#### लक्षणे:

- पानाचा आकार कमी होतो.
- सर्व फांद्या व पाने वळतात तसेच रोप जमिनीच्या दिशेने झुकते व उत्पादन कमी होते

#### नियंत्रण:

- पीक तणमुक्त ठेवावे.
- फुलकिडीनच्या नियंत्रणासाठी फिप्रोनिल (५ एस.सी.) १५ मिलि नापसॅक पंपाने फवारावे.

(संपर्क: +९१ )

★ ★ ★